# कार्यावली

**बुधवार, दिनांक ९ मार्च, २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०१६ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाची कार्यावली.**

**एक.** राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवणे.

**दोन.** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

**तीन.** अध्यक्षांनी, सभाध्यक्ष तालिकेवर सदस्य नामनिर्देशित करणे.

**चार.** प्रश्नोत्तरे.

**पाच.** अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**सहा.** राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**सात.** सन २०१६-२०१७ चा अर्थसंकल्प सादर करणे.

**आठ.** सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**नऊ.** सन २०१५-२०१६ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**दहा.** सन २०१५-२०१६ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान.

**अकरा.** लेखानुदान प्रस्ताव सादर करणे.

**बारा.** सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान.

**तेरा.** लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**चौदा.** अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.

**पंधरा.** सार्वजनिक उपक्रम समितीचे अहवाल सादर करणे.

**सोळा.** उपविधान समितीचा अहवाल सादर करणे.

**सतरा.** विधानसभा आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

**अठरा.** अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**एकोणीस.** विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**वीस.** पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

**एकवीस.** महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**बावीस.** अल्पसंख्याक कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.





**तेवीस.** **शासकीय विधेयके :—**

**खालील विधेयके विधानसभेकडे विचारार्थ प्रलंबित आहेत :—**

(१) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (चौथी सुधारणा) विधेयक, २०१५.

(२) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधयेक, २०१५.

(३) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१५.

(४) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१५.

(५) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७० - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) विधेयक, २०१५.

(६) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७१ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक, २०१५.

**चोवीस.** इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**पंचवीस.** शोक प्रस्ताव.

**सव्वीस.** **अशासकीय विधेयके :—**

**विचारार्थ—**

(१) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ११ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१५ - **श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक २५ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, २०१५ - **श्री. अमीन पटेल, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ४५ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५ - **श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६६ - अल्पसंख्याक समाज (अत्याचारास प्रतिबंध) विधेयक, २०१५ - **श्री. अमीन पटेल, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६७ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१५ - **ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६९ - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०१५ - **श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

सत्तावीस. **अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६) :—**

**श्री. विजय वडेट्टीवार यांचे ठराव क्रमांक १, २ व ३**

(१) "विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प असणे, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असणे, मोठया प्रमाणावर वीज निर्मिती करूनही विदर्भातच मोठया प्रमाणात भारनियमन होणे, भारनियमनामूळे विधार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगताचे होणारे आर्थिक नुकसान, विजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहाणे, यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रंचड नुकसान, विजे अभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी, बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, विदर्भालगत असलेल्या छत्तीसगड राज्यात उद्योगांना वीज सवलतीच्या दरात उपलब्ध होत असल्याने उद्योग त्या राज्यात जाणे ,परिणामी विदर्भाच्या वाट्याला प्रदूषण येवून विकासही न होणे, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची गरज लक्षात घेता तसेच भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, ही अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पिक विमा नुकसानभरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे , याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) "दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्व्हेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."





**श्री. छगन भुजबळ यांचा ठराव क्रमांक १२**

(१२) "सोलापूर विद्यापीठाचा राजमाता अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा 'बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ' असा नामविस्तार करण्याची राज्यातील जनतेची मागणी असल्यामुळे राज्य शासनाने या विद्यापीठांचा नामविस्तार करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. मनोहर भोईर यांचे ठराव क्रमांक १४, १५, १६, १७ व १८**

(१४) "राज्यातील सर्व महामार्गावरील रहदारी ही मोठ्या प्रमाणात वाढली असून त्याचे योग्य रित्या नियोजन न होणे, अरुंद रस्ते, वळणे यामुळे अपघातांचे वाढते प्रमाण, त्यात होत असलेली मनुष्यहानी व वित्तहानी बघता यावर उपाय म्हणून सर्व राज्य महामार्ग व त्यांना जोडणारे रस्ते हे चौपदरीकरण करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१५) "राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१६) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७) "ठाणे, रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारेपाणी शेतजमिनीत शिरून मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या

मालमत्तेचे त्यामुळे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होवू नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यातील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(१८) ''राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवांच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदुषणावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. मंगलप्रभात लोढा यांचे ठराव क्रमांक १९, २०, २१, २२ व २३**

(१९) ''राज्यात पिण्याच्या पिण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२०) ''दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबाना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्यरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२१) ''राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्न धान्य व इतर जीवनावश्यक



वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी,अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२२) ''मुंबई शहरातील वाहतुकीची होणारी प्रचंड कोंडी, वाहनांची वाढती संख्या, अरुंद रस्ते, वाहतूक पोलिसांची अपुरी संख्या, शासनाने बांधलेले उड्डाणपूल, वाहनांची संख्या लक्षात घेता वाहतुकीची समस्या अत्यंत गंभीर बनत चालली असून यावर तातडीने मार्ग काढण्याबाबत व मुंबईतील वाहतूक सुयोग करण्याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२३) ''मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात इमारती कोसळून जीवितहानी व वित्तहानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठ्या प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. प्रताप सरनाईक यांचे ठराव क्रमांक २४ व २६**

(२४) ''राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२६) ''ठाणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जीवित व वित्तहानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे ठाणे महापालिका क्षेत्राकरिता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरिकांची असलेली मागणी, या संदर्भात

साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. सुरेश हाळवणकर यांचे ठराव क्रमांक ३१, ३३ व ३४**

(३१) ''तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही. तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही. यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३३) ''राज्यात अनेक कुटुंबांचे योग्य सर्वेक्षण न झाल्याने त्यांना दारिद्र्यरेषेखालील पिवळ्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत असणे, शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने रुपये १५,००० वार्षिक उत्पन्न दारिद्र्यरेषेखालील मर्यादा १० वर्षापूर्वी ठरविली असणे, तसेच शासनाने नेहरु रोजगार व सुवर्ण जयंती योजनेसाठी दारिद्र्यरेषेची मर्यादा रुपये २५,००० ठरविली असणे, एकाच शासनाचे दारिद्र्यरेषेसाठी असलेले दोन निकष हे विसंगत असणे, यात धान्य वाटपासाठी केंद्र शासनाने ६५.३४ लाख लाभार्थ्यांची संख्या ठरवून दिली असून प्रत्यक्षात ७३.४० लाख लाभार्थी निवडण्यात आले असणे, त्यामुळे केंद्राकडून मिळणारे धान्य अपुरे असल्याने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची मर्यादा रुपये १५,००० वरून रुपये ५०,००० करण्यात यावी व केंद्र शासनाकडून अतिरिक्त धान्याचा कोटा राज्यास देण्याची शासनाने मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३४) ''देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देवून त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**ॲड. आशिष शेलार यांचे ठराव क्रमांक ३५ व ३७**

(३५) ''राज्यात दिवसेंदिवस जमिनीवरील व भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने कमी होत असल्याने व त्यातच पावसाचे प्रमाणदेखील कमी होत असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा दिवसेंदिवस ज्वलंत होत चाललेला प्रश्न लक्षात घेता



जलसंधारणाचा कार्यक्रम प्रभावीरित्या राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३७) ''राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्षतोडीमुळेहोणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, यासाठी निश्चित स्वरूपाचा कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. सुभाष** उर्फ **पंडितशेठ पाटील यांचे ठराव क्रमांक ४७, ४८ व ४९**

(४७) ''कोकणात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/ पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(४८) ''ता. अलिबाग (जि. रायगड) येथील शेतकऱ्यांनी ७६ वर्षांपूर्वी कुळकायदा व कसेल त्याची जमीन हा कायदा अंमलात आणण्यासाठी संपाचे नेतृत्व केलेल्या स्व.नारायण नागू पाटील यांचे चरी येथे यथोचित स्मारक व्हावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(४९) ''राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र विकसित करण्याबाबत तसेच त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोई सुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. संजय पोतनीस यांचे ठराव क्रमांक ५९, ६०, ६२ व १०६**

(५९) ''राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(६०) ''दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्व्हेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयांचे झालेले अवमुल्यन यामुळे रुपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(६२) ''राज्यातील वेगवेगळया प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अदयापही पूर्ण झालेले नसल्यामुळे विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(१०६) ''राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रिडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रिडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. नानाजी शामकुळे यांचे ठराव क्रमांक ६६, २२७ व २२९**

''(६६) ''राज्यात औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे वाढत प्रमाण, त्यामुळे बहुतांश जिल्ह्यात वायू प्रदूषण व जल प्रदूषणाची निर्माण झालेली समस्या, कोळसा खाणीपासून होत असलेले प्रदूषण, उद्योजक करारनामा करुन देखील प्रदूषणाबाबत न पाळत असलेले नियम, त्यातच शासनाला अपुऱ्या साधन सामग्रीमुळे प्रदूषणावर आळा घालण्याकरिता येत असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, या सर्वावर आळा घालण्याकरिता शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''



(२२७) ''शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२२९) ''राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. गोवर्धन शर्मा यांचे ठराव क्रमांक ६७, ६९, ७० व ७१**

(६७) ''राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्षतोडीने होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरूपाचा कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(६९) ''राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(७०) ''शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(७१) ''राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारा अभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समितीस्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी यांचे ठराव क्रमांक ७२, ७३, ७४, ७५ व ७६**

(७२) "राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भुकंप वगैरे नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी व बाधित नागरिकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपदग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७३) "राज्यातील ग्रामीण भागातील सर्व खेडी नजिकच्या महामार्गांना डांबरी रस्त्याने जोडण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अमंलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७४) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता,उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७५) "राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्षतोडीने होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, सिंचन व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७६) "राज्यात, विशेषतः ग्रामीण भागातील बहुसंख्य गावांतून उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना व त्याच्या अंमलबजावणीत होणारी कुचराई यामुळे ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्याअभावी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. जितेंद्र आव्हाड यांचे ठराव क्रमांक ७७, ७८, ७९, ८० व ८१**

(७७) "ठाणे जिल्हयातील मुंब्रा व कळवा ही शहरे एका बाजूने डोंगर व दुसऱ्या बाजूनेसमुद्रखाडी यामध्ये वसलेली असून शहरातील नागरीकरणाचा प्रचंड वेग लक्षात घेता, मुलभूत सोयीसुविधांवर पडत असलेला प्रचंड ताण, या शहरांचा विकास नियोजनबध्दहोणेसाठी



लागणारा कोटयवधी रुपयांचा निधी, हा निधी उपलब्ध करुन देण्याची स्थानिक प्रशासनाची आर्थिक क्षमता नसल्याने या परिसराला मूलभूत सुविधा मिळाव्यात व शहरांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून जादा निधी मिळण्याची नितांत आवश्यकता, विकासाच्या कामांची कालमर्यादा निश्चित करुन ही शहरे उच्च दर्जाची व्हावीत यासाठी शासनाने योग्य ती पावले उचलावीत,अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७८) "राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणावर स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमिपूत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनेवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमिपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७९) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाने आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८०) "ठाणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे ठाणे महापालिका क्षेत्रा करीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, यासंदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८१) “ठाणे महानगरपालिका क्षेत्राचे झपाटयाने होत असलेले नागरीकरण, दिवसेंदिवस वाहनांची वाढती संख्या, अरुंद रस्ते, वाहतूक पोलिसांची अपुरी संख्या, यामुळे परिसरामध्ये वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण होऊन गंभीर समस्या निर्माण झाली असणे,दिवसेंदिवस अपघातांचे वाढते प्रमाण या सर्व बाबींचा विचार करता, परिसरातील वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. अजित पवार यांचे ठराव क्रमांक ८३, ८४, ८५ व ८६**

(८३) “राज्यात उद्योग जगात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगामध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगरांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमीपुत्रांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयामध्ये नोकरी देताना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८४) “राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रिडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८५) “पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांच्या पुर्नबांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासिन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची योग्यरित्या पाहणी न करणे,तसेच वाड्यांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरिता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करुन परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”



(८६) “शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे. याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. जयंत पाटील यांचे ठराव क्रमांक ८७, ९३, ९४ व ९५**

(८७) “खानदेशात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेता खानदेशातील सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(९३) “राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(९४) “शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता,उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(९५) “राज्यातील ग्रामीण भागात महिलांकरिता स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रत्येक गावात महिलांसाठी स्वतंत्र सार्वजनिक महिला स्वच्छतागृहे बाधण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्रीमती मनिषा चौधरी यांचा ठराव क्रमांक ८९**

“(८९) “राज्यात विशेषतः ग्रामीण भागातील बहुसंख्य गावांतून उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या अंमलबजावणीत होणारी कुचराई यामुळे परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्याअभावी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. शशिकांत शिंदे यांचे ठराव क्रमांक ९६ व १००**

(९६) “महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वेस्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वेस्थानक असे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा,अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१००) “राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. दिलीप वळसे-पाटील यांचे ठराव क्रमांक १०१, १०२, १०३ व १०४**

(१०१) “शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे. याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१०२) “राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचराडेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा असणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”



(१०३) “राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारा अभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समितीस्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१०४) “पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांच्या पुर्नबांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासिन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाडयांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरिता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करुन परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. सुरेश लाड यांचे ठराव क्रमांक १०७, १०८, ११० व १११**

(१०७) “शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१०८) “राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवांच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषणावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(११०) “राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पुर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१११) “राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. हनुमंत डोळस यांचे ठराव क्रमांक ११२, ११३, ११४, ११५ व ११६**

(११२) “राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवांच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषणावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(११३) “शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता,उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(११४) “राज्यात उद्योग जगात मोठया प्रमाणावर स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगामध्ये भूमिपुत्राची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड





प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगामध्ये भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भुमिपुत्रांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयामध्ये नोकरी देताना भूमिपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(११५) “राज्यात विशेषतः ग्रामीण भागातील बहुसंख्य गावात उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या अंमलबजावणीत होणारी कुचराई, यामुळे ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(११६) “शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे. याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील यांचे ठराव क्रमांक ११७, ११८, ११९ व १२०**

(११७) “राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(११८) “राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचयतींना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने ह्या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(११९) “राज्यात जीवनावश्यक वस्तुचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातुन रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्न धान्य व इतर जीवनावश्यक वस्तुचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१२०) “राज्यातील विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. नरहरी झिरवाळ यांचे ठराव क्रमांक १२१, १२२, १२३, १२४ व १२५**

(१२१) “शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भुमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१२२) “राज्यात जीवनावश्यक वस्तुंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातुन रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्न धान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१२३) “राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”





(२५१) "राज्यात औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे वाढते प्रमाण त्यामुळे बहुतांश जिल्ह्यांत वायू प्रदुषण व जलप्रदुषणाची निर्माण झालेली समस्या, कोळसाखाणीपासून होत असलेले प्रदुषण, उद्योजक करारनामा करुन देखील नियम पाळत नसणे, विशेषतः ज्या भागात दुर्मिळ वनसंपदा तसेच वन्यजीवांचे वास्तव्य आहे त्या भागात कोळसा खाणींसाठी परवानगी देण्याचा चाललेला प्रकार, त्यामुळे वन व वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येणे, त्यातच शासनाला अपुऱ्या साधन सामुग्रीमुळे प्रदुषणावर आळा घालण्याकरिता येत असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, या सर्वांवर आळा घालण्याकरिता शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी तसेच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास लक्षात घेता आरक्षित वनांच्या ठिकाणी देण्यात आलेले कोलब्लॉक्स रद्द करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२५२) "राज्यातील दूरदर्शनवर तसेच केबल नेटवर्कवर एम. टीव्ही, ए.टी.एन.एफ टीव्ही, जैन टीव्ही आदी चॅनेलव्दारा हा अश्लील व हिंसाचाराला उत्तेजन देणारे चित्रपट, जाहीराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुण पिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील व हिंसाचारयुक्त प्रसारणावर केंद्र शासनाने तात्काळ बंदी घालावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२५३) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. रमेश कदम यांचे ठराव क्रमांक २५६, २५७, २५८, २५९ व २६०**

(२५६) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना

मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२५७) ''राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२५८) ''राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्षतोडीने होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२५९) ''राज्यातील ग्रामीण भागात महिलांकरिता स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रत्येक गावात महिलांसाठी स्वतंत्र सार्वजनिक महिला स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२६०) ''राज्यात स्थापन होणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये ८० टक्के स्थानिक तरुणांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**डॉ. राहूल पाटील यांचा ठराव क्रमांक २६६**

(२६६) ''राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. रामचंद्र अवसरे यांचे ठराव क्रमांक २६८, २६९, २७०, २७१ व २७२**

(२६८) ''महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पीक उत्पन्न क्षमतेपेक्षा विविध देशातील शेतकऱ्यांची पीक उत्पन्न क्षमता कितीतरी पटीने जास्त असल्याने मुक्त अर्थव्यवस्थेच्या युगात राज्यातील शेतकऱ्यांचा भविष्यकाळ अंधःकारमय होणे, राज्यातील शेतकऱ्यांना सतत आर्थिक हालअपेष्टांचा सामना करावा लागणे, नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून राज्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणे, त्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण

(शा.म.मु.) एचबी २८७८—५ (१,६००—३-२०१६)



करण्याची नितांत आवश्यकता, शेतकऱ्यांचे आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी तसेच, त्यांना पुरेसे संरक्षण देण्यासाठी राज्याच्या कृषी विषयक धोरणात निश्चित स्वरुपाचा बदल करण्यासाठी शासनाने ठोस व कालबध्द उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२६९) ''राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षांत घेता राज्यातील जलप्रदूषणावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२७०) ''राज्यात, विशेषतः ग्रामीण भागातील बहुसंख्य गावांतून उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, तसेच विवधि कारणांमुळे बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना व त्याच्या अंमलबजावणीत होणारी कुचराई यामुळे ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्याअभावी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२७१) ''राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरीता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२७२) ''राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समितीस्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. वैभव पिचड यांचे ठराव क्रमांक २७३, २७४, २७६ व २७७**

(२७३) “दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची यादी तयार करतांना राज्यात अनेक कुटुंबाचे सर्व्हेक्षण न होणे, त्यामूळे खरोखरच दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटुंबाना पिवळया रंगाच्या शिधापत्रिका पासून वंचित राहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रूपयाचे झालेले अवमूल्यन यामूळे रुपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनाचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२७४) “राज्यातील किल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून या सर्व किल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२७६) “राज्यातील विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयीसुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२७७) “शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पिक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पनच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस हि विधानसभा शासनास करीत आहे.”





**श्री. डी.एस.अहिरे यांचे ठराव क्रमांक २७९, २८१, २८२ व २८३**

(२७९) “शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पिक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पनच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे. ”

(२८१) “राज्यातील जीवनावश्यक वस्तूंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनास आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाव वाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेले आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वंकष विचार करून जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करून स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२८२) “शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडाणरे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२८३) “तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही. यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. मधुकरराव चव्हाण यांचा ठराव क्रमांक २८४**

(२८४) "दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळया रंगांच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्यावतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्यरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधान सभा शासनास करीत आहे."

**श्री. संग्राम थोपटे यांचे ठराव क्रमांक २८६, २८७ व २८८**

(२८६) "पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासिन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाड्यांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करून परिणामकारक उपाययोजना करावी, ही अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८७) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या लगतच्या ग्रामीण परीसरात महानगरामधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रीया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परीसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका होणारे प्रदुषण त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा असणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रीया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधासभा शासनास करीत आहे."



(२८८) "राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठया प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रिडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. किसन कथोरे यांचे ठराव क्रमांक २८९ व २९१**

(२८९) "दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळया रंगांच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्यावतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्यरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधान सभा शासनास करीत आहे."

(२९१) "राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगामध्ये भूमिपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवा योजना कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगामध्ये भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षीत तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमिपुत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमिपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**डॉ. सतीश पाटील यांचे ठराव क्रमांक २९४, २९५, २९७ व २९८**

(२९४) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा करीत आहे."

(२९५) ‘‘राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.’’

(२९७) ‘‘राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठया प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरीता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्यादृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.’’

(२९८) ‘‘राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभाविरीत्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.’’

**श्री. चरण वाघमारे यांचे ठराव क्रमांक ३०२ व ३०३**

(३०२) ‘‘विदर्भ प्रदेश भौगोलिकदृष्टया अतिशय सक्षम असणे, वीज, पाणी, औद्योगिक वसाहती आणि जमिनी यांची विपुलता असूनही उद्योग आणण्यात शासन अपयशी ठरणे, मोठया प्रमाणात वीज निर्मीती होऊनही शासनाने प्रचंड प्रमाणात भारनियमन करणे, भारनियमनामुळे शेतीला सिंचित करण्यास शेतकरी अपयशी ठरणे, सिंचनाचे अनेक प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे मोठया प्रमाणावर शेती सिंचनापासून वंचित राहणे, यामुळे विदर्भात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यास शासन अपयशी ठरणे, विदर्भात खनिज संपत्ती मोठया प्रमाणावर असूनही विदर्भाला फायदा न झाल्याने विदर्भाचा अनुशेष वाढतच जाणे, शासनाच्या उदासीनतेमुळे विदर्भाचे दरडोई उत्पन्न कमी असणे, विदर्भ भौगोलिकदृष्टया सक्षम असूनही केवळ शासनाच्या उदासिनतेमुळेच मागासलेला असणे, यामुळे विदर्भ राज्याची निर्मिती होण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.’’



(३०३) ‘‘महाराष्टातील शेतकऱ्यांच्या पीक उत्पन्न क्षमतेपेक्षा विविध देशातील शेतकऱ्यांची पीक उत्पन्न क्षमता कितीतरी पटीने जास्त असल्याने मुक्त अर्थव्यवस्थेच्या युगात राज्यातील शेतकऱ्यांचा भविष्यकाळ अंध:कारमय होणे, राज्यातील शेतकऱ्यांना सतत आर्थिक हालअपेष्टांचा सामना करावा लागणे, नापिकी व कर्जबारीपणाला कंटाळून राज्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणे, त्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्याची नितांत आवश्यकता, शेतकऱ्यांचे आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी तसेच त्यांना पुरेसे संरक्षण देण्यासाठी राज्याच्या कृषी विषयक धोरणात निश्चित स्वरुपाचा बदल करण्यासाठी शासनाने ठोस व कालबद्ध उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.’’

**श्री. प्रशांत ठाकूर यांचे ठराव क्रमांक ३०८ व ३१०**

(३०८) ‘‘राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने ह्या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपावाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.’’

(३१०) ‘‘राज्यात विशेषतः ठाणे, रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीतील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी शेतजमिनीत शिरून मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठ्याप्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी ‘‘शासनाने या चारही जिल्ह्यातील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशीही शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.’’

**श्री. राजेश काशीवार यांचे ठराव क्रमांक ३१७, ३१८ व ३१९**

(३१७) ‘‘विदर्भ प्रदेश भौगोलिकदृष्ट्या अतिशय सक्षम असणे, वीज, पाणी, औद्योगिक वसाहती आणि जमिनी यांची विपुलता असूनही उद्योग आणण्यात शासन अपयशी ठरणे, मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती होऊनही शासनाने प्रचंड प्रमाणात भारनियमन करणे, भारनियमनामुळे शेतीला सिंचित करण्यास शेतकरी अपयशी ठरणे, सिंचनाचे अनेक

प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे मोठया प्रमाणावर शेती सिंचनापासून वंचित राहणे, यामुळे विदर्भात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांविण्यास शासन अपयशी ठरणे, विदर्भात खनिज संपत्ती मोठया प्रमाणावर असूनही विदर्भाला फायदा न झाल्याने विदर्भाचे दरडोई उत्पन्न कमी असणे, विदर्भ भौगोलिकदृष्ट्या सक्षम असूनही केवळ शासनाच्या उदासिनतेमुळेच मागासलेला असणे, यामुळे विदर्भ राज्याची निर्मिती होण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३१८) ''महाराष्टातील शेतकऱ्यांच्या पीक उत्पन्न क्षमतेपेक्षा विविध देशातील शेतकऱ्यांची पीक उत्पन्न क्षमता कितीतरी पटीने जास्त असल्याने मुक्त अर्थव्यवस्थेच्या युगात राज्यातील शेतकऱ्यांचा भविष्यकाळ अंधःकारमय होणे, राज्यातील शेतकऱ्यांना सतत आर्थिक हालअपेष्टांचा सामना करावा लागणे, नापिकी व कर्जबारीपणाला कंटाळून राज्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणे, त्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्याची नितांत आवश्यकता, शेतकऱ्यांचे आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी तसेच त्यांना पुरेसे संरक्षण देण्यासाठी राज्याच्या कृषी विषयक धोरणात निश्चित स्वरुपाचा बदल करण्यासाठी शासनाने ठोस व कालबद्ध उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३१९) ''विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प असणे, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असणे, मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती करुनही विदर्भातच मोठ्या प्रमाणावर भारनियमन होणे, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगताचे होणारे आर्थिक नुकसान, विजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे, यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजे अभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, विदर्भालगत असलेल्या छत्तीसगढ राज्यात उद्योगांना वीज सवलतीच्या दरात उपलब्ध होत असल्याने उद्योग त्या राज्यात जाणे, परिणामी विदर्भाच्या वाट्याला प्रदूषण येऊन विकासही न होणे, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दराने वीज पुरवठाकरण्याची गरज लक्षात घेता तसेच भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''



**श्री. संतोष दानवे यांचे ठराव क्रमांक ३२३, ३२४, ३२५ व ३२६**

(३२३) ''शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पिक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३२४) ''शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते , अवजारे, किटकनाशके, यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे''

(३२५) ''दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्व्हेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमुल्यन यामुळे रुपये ५०००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३२६) ''राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असेलेले प्रमाण, बेसुमार वृक्षतोडीनेहोणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. हर्षवर्धन सपकाळ यांचे ठराव क्रमांक ३२७, ३२८ व ३२९**

(३२७) ''राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील

जलसाठ्यांचा नियोजन पूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३२८) ''दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्व्हेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधा पत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३२९) ''राज्यातील ग्रामीण भागात महिलांकरिता स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रत्येक गावात महिलांसाठी स्वतंत्र सार्वजनिक महिला स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. पांडुरंग बरोरा यांचे ठराव क्रमांक ३३५, ३३६, ३३७, ३३८ व ३३९**

(३३५) ''राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषणावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३३६) ''कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण झालेली व होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे वीज निर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या



दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युद्धपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३३७) ''राज्यात दिवसेंदिवस जमिनीवरील व भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने कमी होत असल्याने व त्यातच पावसाचे प्रमाण देखील कमी होत असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा दिवसेंदिवस ज्वलंत होत चाललेला प्रश्न लक्षात घेता जलसंधारणाचा कार्यक्रम प्रभावीरित्या राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३३८) ''तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही व आर्थिक भुर्दंडही सोसावा लागणार नाही यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३३९) ''राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना शासकीय सेवेत काही जागांचे आरक्षण ठेवण्याची तरतूद करण्याबाबत व त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना आखण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. सुरेश भोळे यांचा ठराव क्रमांक ३४३**

(३४३) ''राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत पद्धतीने व योग्य प्रकारे पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. प्रकाश फातर्पेकर यांचे ठराव क्रमांक ३४९, ३५०, ३५१, ३५२ व ३५३**

(३४९) ''राज्यात अनाथ, निराधार परित्यक्त्या, घटस्फोटीता, विधवा, अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या आपदग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा समाजात होणारा शारिरीक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३५०) ''शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता,उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा करीत आहे.''

(३५१) ''राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३५२) ''राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३५३) ''मुंबई शहरातील वाहतुकीची होणारी प्रचंड कोंडी, वाहनांची वाढती संख्या, अरुंद रस्ते, वाहतूक पोलीसांची अपुरी संख्या, शासनाने बांधलेले उड्डाणपूल व वाहनांची संखा लक्षात घेता वाहतुकीची समस्या अत्यंत गंभीर बनत चालली असून यावर तातडीने मार्ग काढण्यासाठी व मुंबईतील वाहतूक सुयोग्य करण्याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान सभा शासनास करीत आहे.''



**श्री. मंगेश कुडाळकर यांचा ठराव क्रमांक ३५८**

(३५८) ''राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभाविरीत्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. संदीप नाईक यांचे ठराव क्रमांक ३६२, ३६३, ३६४ व ३६५**

(३६२) ''ठाणे, सिधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेकवेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी जमिनीत शिरून मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे त्यामुळे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता, समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यांतील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३६३) ''राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३६४) ''मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी करून त्याचा विकास करणे, पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठ्या प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाश्यांत पसरलेला तीव्र असंतोष, यासंदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक

उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३६५) ''राज्यातील उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भुमिपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षत तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमिपुत्रांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमिपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे''

**श्री. राहुल जगताप यांचे ठराव क्रमांक ३७४, ३७५, ३७६, ३७७ व ३७८८**

(३७४) ''शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३७५) ''राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्षतोडीने होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरूपाचा कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३७६) ''शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''



(३७७) ''राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(३७८) ''राज्यात स्थापन होणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये ८० टक्के स्थानिक तरुणांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**अठ्ठावीस.** सभागृहासमोर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्ररित्या वितरित करण्यात येईल).

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ मार्च २०१६.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई